<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२००५ मधील निशाणी क्र. ८३ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी नि.क्र. ७५, ७७, ७९, ८१ वरील आदेशाप्रमाणे झालेला खर्चाच्या आदेशाची पूर्तता करणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यामध्ये नि.क्र. ७५ चा अर्ज अबेटमेंट चा आदेश रद्द होणेसाठी, नि.क्र. ७७ चा अर्ज विलंब माफ होवून मिळणेसाठी, नि.क्र. ७९ चा अर्ज मयताचे वारस अभिलेखावर घेणेसाठी, नि.क्र. ८१ चा अर्ज 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द होणेत यावेत, यासाठी अर्ज दाखल केले होते. नि.क्र. ७५ व ७७ हे प्रत्येकी तीन हजार रुपयांवर व नि.क्र. ७९ व ८१ हे प्रत्येकी दोन हजार रुपयांवर मंजूर करण्यात झाले होते. तरी सदर खर्चाची रक्कम आजरोजी भरण्यास परवानगी मिळावी, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, हरकत नोंदविली आहे. वादी यांना रक्कम भरणेसाठी योग्य संधी दिली होती. वादी हे प्रथमपासून न्यायालयाच्या आदेशाबाबत जागरुक नाहीत व योग्य कारण नाही. तरी सदरची रक्कम भरण्यास हरकत आहे.

३. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेख पाहिला. मा. जिल्हा न्यायालय, पंढरपूर यांनी आदेशान्वये सदरचे प्रकरण हे मुदतीत (Time bound matter) निकाली करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील प्रत्येक टप्पा दिलेल्या मुदतीत निकाली करणे बंधनकारक आहे. वादींना संधी देवून देखील नि.क्र. ७५, ७७, ७९ व ८१ हे अर्जावर लादलेला खर्च मुदतीत भरलेले नाहीत. सदरचा दावा सरस निरस मानाने वाटप होण्यासाठी, पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने नि.क्र. ७५, ७७, ७९ व ८१ चा अर्जावरील

आदेशाप्रमाणे खर्च भरण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. न्यायालयाने सदरचे अर्ज दि.०१.०८.२०२४ रोजी नि.क्र. ७५ व ७७ हे प्रत्येकी तीन हजार रुपयांवर व नि.क्र. ७९ व ८१ हे प्रत्येकी दोन हजार रुपयांवर मंजूर करण्यात आले होते व सदर आदेशात खर्च पुढील तारखेपर्यंत देण्यात यावा, असे देखील आदेशीत केले होते. परंतू वादीने सदरचा खर्च वेळेत भरलेला नाही. परंतू हे न्यायाचे गृहीत तत्व आहे की, प्रत्येकाला त्याची बाजू मांडण्याची संधी मिळावी. मात्र वादीच्या दिरंगाईमुळे प्रतिवादीला शारिरीक, आर्थिक व मानसिक त्रास होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीला नुकसान भरपाई देणे योग्य ठरेल. वरील चर्चेच्या अनुषंगाने, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज रक्कम रुपये शंभरच्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्याने नि.क्र. ७५, ७७, ७९, ८१ व प्रस्तुत अर्जातील खर्च रक्कम (३०००+३०००+२०००+२०००+ १००=१०१००) प्रतिवादी यांना आजरोजी द्यावी. त्यानंतर वरील नि.क्र. ७५, ७७, ७९ व ८१ च्या अर्जाप्रमाणे पूर्तता करावी.

३. दोन्ही पक्षांना असे निर्देशित करण्यात येते की, मा. जिल्हा न्यायालय, पंढरपूर यांचे आदेशान्वये सदरचे प्रकरण हे मुदतीत (Time bound matter) निकाली करण्याचे निर्देश दिल्यामुळे, सदरचे प्रकरण लवकरात लवकर चालवावे.

SHRUTI NILESH GANGWAL SHAH

Digitally signed by SHRUTI NILESH GANGWAL SHAH
Date: 2024.08.08 16:39:32 +0530

(श्रीमती एस.एन. गंगवाल–शाह)

दिनांक – ०८/०८/२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer : P.T. Jadhav

(b) Name of the Court : C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order signed by P.O. on : 08.08.2024.

(d) Order uploaded on : 08.08.2024.